Rotary

LET'S CREATE A LEGACY 2025-26

UNITE FOR GOOD

# MIRROR

Monthly Bulletin



## JULY 2025

## ROTARY CLUB TRADE CITY JAYSINGPUR

Rotary Dist. 3170 Club No. 224200

Rotary Club Trade City Jaysingpur

UNITE FOR GOOD

## पदग्रहण सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा..!



Dist. 3170 | Club No. 224200 | Mirror Monthly Bulletin | July 2025 | 1st Issue | Editor : Rtn. Milind Bhide

Rotary

Installing Officer



PDG Rtn. Harish Motwani

Asst. Governer



Rtn. Girish Kulkarni

# UNITE FOR GOOD

## Rotary Club Trade City Jaysingpur 2025-26

# पदग्रहण सोहळा

## 5th Installation Ceremony



Rtn. Francesco Arezzo
RI President




Rtn.Er. Arun D. Bhandare
District Governor 2025-26



Rtn. Dr. Atique Patel
President 2025-26



Rtn. Mahendra Porwal
Secretary 2025-26



Rtn.Adv. Uday Kulkarni
Treasurer 2025-26

# पदग्रहण सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा..!

**Ar. Vijay A. Khade**
G.D.Arch. A.I.I.A.
Reg. No. CA/75/185
Cell : 9422518145

**Er. Vinesh V. Khade**
B.E.Civil
Cell : 9422414335
9552564335

**Er. Vipin V. Khade**
D.C.E.
B.Arch
Cell : 9604789848

**Khade & Associate**

- Architech Interior Designer
- Consulting Engineer
- Valuer

Madhuban Colony, Plot No. 24, Laxmi Road, **JAYSINGPUR**.

आता फॅन्सी व ब्रँडेड
इलेक्ट्रीकल मटेरियलसाठी
इतरत्र बाहेर
जाण्याची गरज नाही...

STOP

आता हे सगळं...
एकाच छताखाली
आपल्या जयसिंगपूरमध्ये

होलसेल व रिटेल
इलेक्ट्रीकल मटेरियलचे भव्य शोरूम...

**चॉईस इलेक्ट्रीक**

९ वी गल्ली, सुभाष रोड, बँक ऑफ इंडीया शेजारी,
जयसिंगपूर - ४१६ १०१, कोल्हापूर.
मो.: 9890880026
ई-मेल: choiceelectric14@gmail.com

Abhay
Choice of Kids
Abhay Chatpati imli
Abhay
Jujube

प्रोप्रा. रसिका बनजवाडे मो. ९८२२७३३५५८

**संस्कृती फूड प्रोडक्टस्**

उत्पादक : अभय पेप्सी, आईस्क्रिम, ईमली, फ्रुट जेली, बेर जाम

शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर - ४१६ १०१.

www.abhayicecream.com | abhayicecream@gmail.com

**BHUSHAN**
ENGINEERS

MANUFACTURER OF
CONVEYOR SYSTEM & ALL SPARES

- SUGAR
- CEMENT
- POWER PLANT
- AGRO
- FOOD
- CHEMICAL
- FERTILIZERS
- FOUNDRY
- MINES
- AUTOMOBILE
- STONE CRUSHER

Rtn. Suraj Mali
Bhushan Engineers
Gat No. 315/2, Plot No. 27,
Chh. Shahu Co-Opp Industrial Estate,
Mouje Agar, Jaysingpur
Tal - Shirol, Dist - Kolhapur
Mob. No. - 08208532421, 09922137773



रोटे. मिलींद भिडे
संपादक

# संपादकीय

रोटरी क्लब जयसिंगपूर ट्रेड सिटी या क्लबचा ५ वा पदग्रहण सोहळा मोठ्या दिमाखाने पार पडत आहे. या वर्षीच्या क्लबच्या मंथली बुलेटीन ''मिरर'' ची एडीटरची महत्वाची कामगिरी अध्यक्षांनी माझ्याकडे सोपविलेली आहे. रोटरी इंटरनॅशनल प्रेसिडेंट रोटे. फ्रान्सिस्को अरेझो यांनी आम्हा सर्व रोटरीयन्सना अतिशय सुंदर अशी 'Unite for Good' ही थिम दिली आहे.

कोणतीही संस्था सामान्य माणसाला असामान्य करण्याचा प्रयत्न करीत असते. त्याप्रमाणे रोटरी ही आंतरराष्ट्रीय संस्था गरीब, दिन-दुबळ्यांसारख्या लोकांना स्वत:च्या पायावर उभा राहायला शिकवते आणि त्यांचा सन्मानही करते. आमच्या ट्रेड सिटी क्लब मार्फत प्रदूषण मुक्त आणि सिंगल युज प्लास्टिक मुक्त परिसर करावयाचा प्रयत्न करीत आहे. ई-कचरा मुक्त करणेचा प्रकल्प हा आम्ही सन २०२४-२५ चे अध्यक्ष रोटे. राकेश पारीक यांच्या कालावधीत हाती घेतला आहे. यासह स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण असे उपक्रम आमच्या क्लब मार्फत राबविले जात आहेत. असे अनेक संकल्प यावर्षात आम्ही करणार आहोत.

आजवर अनेक नवनवीन समाजपयोगी उपक्रम यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थिनींना सायकल वाटप, शालेय साहित्य, गणवेश, पावसाळ्यात विद्यार्थ्यांना छत्री वाटप, गोरगरीब महिलांना शिवणयंत्र वाटप इ. अनेक उपक्रम राबविले जात आहेत. तसेच समाजातील विविध मान्यवरांना व्होकेशनल अवॉर्ड ने सन्मानीत करण्यात येते. यासह जयसिंगपूर भूषण हा मानाचा सन्मान आपल्या क्लबमार्फत दिला जातो.

आज दि. २६ जुलै २०२५ रोजी रोटरी ट्रेड सिटीचा पाचवा पदग्रहण सोहळा व यानिमित्त होणारे मिरर चे प्रकाशन डिस्ट्रीक ३१३२ चे पास्ट डिस्ट्रीक गर्व्हनर रोटे. हरीष मोटवानी ह्यांच्या हस्ते सहकार महर्षी स्व. शामराव पाटील यड्रावकर नाटयगृहात करण्यात येणार आहे.

हा अंक आपल्या पसंतीस उतरेल याची मला खात्री आहे. रोटरी ट्रेड सिटीचे अध्यक्ष रोटे. डॉ. अतिक पटेल, सेक्रेटरी रोटे. महेंद्र पोरवाल, ट्रेझरर रोटे. ॲड. उदय कुलकर्णी व सर्व सदस्य, सर्व जाहिरातदार, देणगीदार व पत्रकार त्याचबरोबर रोटरी ट्रेड सिटीवर प्रेम करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे मी यानिमित्ताने शतश: आभार व्यक्त करतो.

रोटरी ट्रेड सिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या वाटचालीस शुभेच्छा !

# पदग्रहण सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा..!

SKF NORTON TAPARIA MIRANDA KPT
Fenner (Fenner India Limited) Unbrako (THE WORLD LEADER) STANLEY (Hand Tools)

Industrial Material Supplier
## M M Associates
## Aditya Associates

Distributors of

- Grindwell Norton
- Addison
- Miranda Hacksaw
- Fenner V Belts
- Measuring Instruments
- Power Tools
- Taparia Hand Tools
- Totem
- Unbrako Fasteners
- SKF Bearings
- Weldings Machinery & Accessares
- All Type of Engineering Materials

**Milind Bhide**
Rukmini Apartment, Lane No. 10,
Behind Savariya Cold Drinks, Jaysingpur. 416 101.
Tel. : + 91 2322 224599, Cell : +91 9422414681
Email : bhidemilind.mb@gmail.com

INTEKHAB MARUF
✆ 9403464067
9011488380

## MARRIYA ALUMINIUM
Authorised Wender Indian Oil Corporation
*Canopy Facia, Column Clidding, Spreader, Indian Oil Logo, Office Clidding*



**Add. :** Maleka Patel Hospital, Laxmi Park, 18th Lane, **JAYSINGPUR** - 416 101.
Email : almariya295@gmail.com

## GALAXY ENTERPRISES
All Type Of Glass Solutions | AUTHORISED DEALER
Aludecor - Aluminium Composite Panel

**Add. : JAYSINGPUR** - 416 101. Tal. Shirol, Dist. Kolhapur.

## MAX POWER LIFE AUTOMOBILE BATTERY




Urja BATTERY

Manufactured By :
**URJA INDUSTRIES**
Plot No. 131, L. K. Akiwate
Industrial Estate, Jaysingpur 416 144.
Tal. Shirol, Dist. Kolhapur, Maharashtra
Contact : 02322 222234, 9822 96 31 74
E-mail : manoharmali359@gmail.com

SANGLI | KOLHAPUR

## SOLAR ROOFTOP SYSTEM
For Residential | Commercial | Industrial

SUDIN SOLAR ENERGY
SUDIN SOLAR

Subsidy Available For Residential Solar System

GET 5% OFF
On Immediate Confirmation



✓ ROI Within 4 to 5 Years
✓ EMI/LOAN Service Available

✆ 99211 74379
Sudin Lane No.18, Laxmi Park, Laxmi Road Gat.No. 39/18b Jaysingpur Tal. Shirol Dist



रोटे. राकेश पारीक
IPP 2025-26

# आदर्शवत कारकिर्द

रोटे. राकेश पारीक यांनी रोटरी क्लब ट्रेड सिटी जयसिंगपूर सन २०२४–२५ सालामध्ये आपल्या अध्यक्षीय कार्यकाळात अनेक उपक्रम करून आपली कारकिर्द यशस्वीपणे पार पाडली त्याचा आढावा खालील प्रमाणे.

रोटे. राकेश यांनी आपल्या सन २०२४–२५ च्या अध्यक्षीय कार्यकाळात अनेक समाजपयोगी व शैक्षणिक क्षेत्रामध्ये विविध उपक्रम करून ट्रेड सिटीच्या इतिहासामध्ये आपले नांव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. कारण स्वत:चा वेळ व पैसा खर्च करून समाजकार्य करणारे फारच थोडे असतात. पण यांचा आदर्श पुढील होणाऱ्या सर्व अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी घ्यावा.

त्यांच्या कारकिर्दीत अत्यंत महत्वाचे दोन उपक्रम म्हणजे रोटरी क्लब ट्रेड सिटी चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी पब्लिक स्कूलची स्थापना. ‘‘आधी केले मग सांगितले’’ या उक्तीप्रमाणे चॅरिटेबल ट्रस्टमध्ये स्व: निधी जमा करून मग इतर देणगीदार व सदस्यांकडून देणगी घेऊन रू. ८,०८,०८५/– इतक्या भरघोस रक्कमेच्या ठेव पावत्या तयार करून एक आदर्श निर्माण केला. स्वखर्चातून स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनानिमित्त गरजू विद्यार्थिनींना २२ सायकलींचे वाटप, राजीव गांधी नगर व जयसिंगपूर पोलीस स्टेशन येथे सार्वजनिक कुपनलिकेसाठी सबमर्सिबल पंप, आई वृध्दाश्रम येथील वृध्दांना वॉकर दिले, ल.पा. गर्ल्स हायस्कूल व नवजीवन हायस्कूल येथील विद्यार्थिनींकरिता मासिक पाळीसंदर्भात तज्ञ डॉक्टरांकडून प्रबोधन व सॅनिटरी पॅडचे वितरण करणेत आले, चंद्रनारायण बलदवा हायस्कूलमध्ये विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड वेंडींग मशिन व सॅनिटरी पॅड इन्सीनेटर मशिन स्वखर्चातून उपलब्ध करून दिले. वारकरी संप्रदायासाठी संगमनेर येथील आषाढी एकादशी दिंडीसाठी धर्मपूरी येथे महाप्रसादाचे वाटप केले.

वरील कार्यासोबतच डॉक्टर्स डे, सी.ए. डे व फार्मर्स डे निमित्त सर्वांचा योग्य सन्मान केला. नेशन बिल्डर अॅवॉर्ड अंतर्गत ६ शिक्षकांना सन्मानीत केले, व्होकेशनल अॅवॉर्डने ५ जणांना सन्मानीत केले, अभियंता दिनानिमित्त सर विश्वेश्वरय्या जीवन गौरव पुरस्कार व सर विश्वेश्वरय्या प्रेरणा पुरस्कार देणेत आला. हृदयविकार व मधुमेह रूग्णांसाठी मेडिकल कॅम्पचे आयोजन केले. प्रत्येक महिन्यात क्लबमधील विविध सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त फेलोशिप डिनरचे आयोजन केले. सर्व ४८ रोटरी सदस्यांच्या फॅमिली भिशीचे यशस्वी आयोजन केले. जावळी (आंबा) ता. शाहूवाडी व साधळे माधळे ता. पन्हाळा येथे क्लबमधील सदस्यांचे निवासी गेट टूगेदर केले.

रोटे. राकेश हे सामाजिक कार्यासोबतच कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यातही अग्रेसर आहेत. त्यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या बुध्दीमत्तेला चालना मिळावी यासाठी चंद्रनारायण बदलवा हायस्कूलमध्ये बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन केले. लक्ष्मीबाई पाटील गर्ल्स हायस्कूल व नवजीवन हायस्कूल येथील विद्यार्थ्यांचे मानसिक मुल्यांकन करून योग्य करिअर निवडण्यासाठी सेमिनारचे आयोजन केले. नाट्यशुभांगी जयसिंगपूर व रोटरी क्लब ट्रेड सिटीच्या संयुक्त विद्यमाने ‘‘इथे ओशाळला मृत्यू’’ या छ. संभाजी महाराज यांच्या जीवनावरील नाटकाचे सादरीकरण केले. माई ह्युंदाई व रोटरी क्लब ट्रेड सिटीच्या संयुक्त विद्यमाने ‘‘एक शाम डॉक्टर के नाम’’ हा गीतांचा कार्यक्रम साजरा केला.

अशा या बहुआयामी रोटरी नेतृत्वाने विविध उपक्रम साजरे करून सर्व रोटेरियन्सच्या मनात आपले आदराचे स्थान निर्माण केले आहे. वरील सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात रोटे. राकेश यांना सेक्रेटरी रोटे. डॉ. अतिक पटेल व सर्व रोटरी सदस्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे.



Rtn. Francesco Arezzo
RI President 2025-26

## *Message from RI President*

One of the most important things we can do to tell our Rotary stories in an effective, compelling way is to make sure we all use consistent and unified messaging. You can use the president's message for 2025-26, Unite for Good, to inspire members, participants, and the public with an idea that aligns with our Action Plan and calls on us to work together.

Using the presidential message in your club and district communications helps to convey Rotary's global impact and create stronger recognition of Rotary's name in our communities and with potential service partners. It can help people understand who we are and what we do and might even inspire them to join us.





**रोटे. हरिष मोटवानी**
PDG Dist. 3130

# परिचय

आकाशाकडे झेप घेतांना आपले पाय मुळाशी घट्ट रोवून ठेवणारा व्रतस्थ उद्यमी, सेवावर्ती 'पीडीजी रोटरीयन हरिष रुपचंद मोटवाणी' एका सुसंस्कृत, आनंदी आणि नीतिमूल्ये जोपासणाऱ्या कुटुंबाची पार्श्वभूमी असलेले हरिष हे शिस्तप्रिय विद्यार्थी ते यशस्वी उद्योजक नेता अशी भरारी घेतली आहे.

मुंबई विद्यापीठ येथे फार्मसी पदविका पूर्ण केल्यानंतर ३१ वर्षांच्या ट्रेडिंग व मार्केटिंग च्या प्रदीर्घ अनुभवासोबत प्रिया मेडिकल स्टोअर्स ही फर्म त्यांनी सुरू केली आणि आज प्रतीक एंटरप्राइजेस आणि झेनिया मेडी सायन्सेस या फर्म त्यांच्या नावावर आहेत.

व्यवसायामध्ये भरभराट चालू असताना देखील समाज ऋण पूर्ण करण्यासाठी त्यांनी रोटरी सारख्या आंतरराष्ट्रीय सामाजिक संघटनेमध्ये १९९७ साली प्रवेश केला आणि एक रोटरी सदस्य ते बीड जिल्ह्यातील पहिले डिस्ट्रिक्ट गव्हर्नर (प्रांतपाल ३१३२) हा सन्मान त्यांनी प्राप्त केला आहे.

रोटे. हरिष यांच्या रोटरी कार्याचा संक्षिप्त आढावा घ्यायचा झाला तर तो या प्रमाणे आहे, २००१ / २००२ रोटरी क्लब बीड मिडटाऊनचे अध्यक्ष, असिस्टंट गव्हर्नर २००७ / २००८, डिस्ट्रिक्ट लेव्हल कमिटी चेअरमन, जीएसआर, डिस्ट्रिक्ट अव्हेन्यू डायरेक्टर, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी, फोरम लीडर, स्पीकर अॅट फोरम, इतर अनेक रोटरी डिस्ट्रिक्ट मध्ये देखील मार्गदर्शन केले आहे महिला सबलीकरण हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून महिलांना रोटरी फ्रेंडशिप एक्सचेंज प्रोग्राम मध्ये मेक्सिको देशासोबत सहभागी २०१६/२०१७. रोटरी फाउंडेशन मध्ये हरिष मेजर डोनर लेव्हल १ आहेत.

विविध मेडिकल प्रोजेक्ट मध्ये हिरिरीने सहभागी, महिला सबलीकरण हे डोळ्यासमोर उद्दीष्ट ठेवून महिलांना सदोदित सहकार्याची भावना, लोळदगाव येथे हॅपी स्कूल प्रोजेक्ट, RI Presidential Citation Award ने सन्मानित. त्यांची गव्हर्नर पदाची कारकीर्द ही कोविड काळातच म्हणजे २०२०-२१ मध्ये होती. परंतु अशाही परिस्थितीमध्ये त्यांनी संपूर्ण डिस्ट्रिक्टला ऑनलाइनच्या माध्यमातूनही व्हायब्रेट ठेवत मोठ मोठे प्रोजेक्ट्स जसे की त्या काळातील आवश्यकतेनुसार ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन मशीन, कोविड केअर सेंटर, कोविड इफेक्टेड कुटुंबांना शिलाई मशीनचे वितरण, अंध मुक्त गाव, किचन किंवा टेरेस गार्डन आणि विविध हेल्थ प्रोजेक्ट्स, ग्लोबल ग्रँट प्रोजेक्ट्स हे खूप मोठ्या प्रमाणावर राबवले.

हरिष च्या बाबतीत एक मात्र सर्वांचा अनुभव आहे की रोटरी च्या कुठल्याही प्रोजेक्टसाठी हरिष 24x7 उपलब्ध असतात. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पर्यंतचा त्यांचा हा प्रवास पार पाडण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची देखील त्यांना खूप साथ मिळाली आहे. थोरले बंधू राम मोटवाणी यांच्या सोबतच हरिष यांच्या पत्नी सौ रेणु मुलगा प्रतीक (कॉम्प्युटर इंजिनिअर), मुलगी किरण (बॅचलर इन मास मीडिया) यांची संपूर्ण साथ त्यांना मिळत आहे.

सौ. रेणू या एकत्र कुटुंबात राहून सर्व कुटुंबातील सदस्यांना सतत आनंदी, एकत्र बांधून ठेवतात. रोटरीच्या कार्याव्यतिरिक्त हरिष ची वेगळी ओळख म्हणजे हरिष हे उत्तम गायक आहेत त्याचबरोबर सिंधी कॉन्सिल ऑफ इंडियाचे जॉईंट सेक्रेटरी असून बीड जिल्हा केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशनचे सदस्य देखील आहेत. जगण्याच्या प्रयोजनाचे रहस्य ज्यांना कळते ती माणसे विरळ असतात, पण अशीच माणसे आपल्या जगण्यातून एक धडा पुढील पिढ्यांसाठी ठेवतात. हरिष हे त्या विरळ लोकांपैकी एक.



रोटे.इंजि. अरूण डी. भंडारे
Dist. Governer 2025-26

# परिचय

Rtn. Arun Daniel Bhandare is a member of Rotary club of Ichalkaranji Executive & has been serving Rotary & the community of RID 3170(India) for over 28 years.

He is a graduate of Civil Engineering with a bright educational career. He is an accomplished consultant, valuer & Building Contractor. He is known for his expertise in construction of Industrial structures, showrooms, Hotels, commercial complexes, Multiplex Theaters, educational institutes & Bunglows.

He is Member of Indian Council of Arbitration, Govt. approved valuer: Chartered Engineer & recipient of Award of excellence from various professional organizations which includes CREDAI & Institution of Engineers (India). He was the President of Builders Association of India, Engineers & Architects Association at Ichalkaranji.

Socially & professionally he is associated with Ichalkaranji Church. His involvement & exemplified Service to the community is honoured with - SAMAJ RATNA national award.

Rtn. Arun served his club as President in 2010-11 & was bestowed with 20 Awards with Best President Award along with 15 other District Awards, 4 Rotary International Awards. India National Polio Plus Award were the highlight of his success story as the leader of the club.

Rtn. Arun & Madhavi are proud Donors to The Rotary Foundation with a reorganization of being a Major Donor. His Service to Rotary District 3170 has been appreciated with laurels by Rotary International Awards. namely-Club builder award (Twice), Avenues of service Award (Twice) & TRF District Service Award.

He is the founder Trustee of Deepak Memorial Trust which helps the needy and deserving by supporting the cause of education & health. An amount of Rs. 25, 00,000/- has been invested to uplift the economically weaker families. He is blessed with 02 sons & 01 Daughter. Son Amol is B.Tech & serving in Multinational Company. He is a Gold medalist for India in Go-Carting at Dubai. Daughter Capt. Esther is a commercial pilot of Boeing 787 Dreamliner on International flights & her husband is HOD of Medical Tourism for 52 countries and Global Head for 82 Countries. Younger son Aashish is married to Interior Designer Neelam & the couple is managing the family business of Construction and running their own Interior Designer Company.

Rtn. Arun has a perfect life partner in Rtn. Madhavi who is a qualified Trainer for slow leaner students. Rtn. Madhavi is the Past President of Innerwheel club of Ichalkaranji with Best President Award & Best ISO Award to her credit. R.L. Dist. 3170 is fortunate have an accomplished Rotary & Business leader to lead the District during 2025-26, who has been nominated & selected unanimously as the DISTRICT GOVERNOR.

# Board of Director 2025-26


**Rtn. Dr. Atique Patel**
President


**Rtn. Mahendra Porwal**
Secretary


**Rtn. Adv. Uday Kulkarni**
Tresurer


**Rtn. Rakesh Pareek**
IPP


**Rtn. Santosh Khamkar**
President Elect.


**Rtn. Rajgonda Patil**
Vice President


**Rtn. Intekhab Maruf**
Joint Secretary


**Rtn. Adv. Prasad Kale**
Sargent at Arms


**Rtn. Dashrath Shetye**
Executive Secretary


**Rtn. Prashant Patil**
Club Service


**Rtn. Ramesh Yalgudkar**
Community Service


**Rtn. Sunil Pareet**
Vocational Service


**Rtn. Mahesh Patil**
International Service


**Rtn. Vinayak Mali**
Youth Service


**Rtn. Shivraj Patil**
Club Learning Facilitator


**Rtn. Nitin Zele**
Service Project


**Rtn. Mahaveer Kade**
Club Administration


**Rtn. Satish Jadhav**
Public Image


**Rtn. Manohar Mali**
Rotary Foundation


**Rtn. Sunil Patil**
Membership Development


**Rtn. Vidyasagar Bastwade**
Pulse Polio


**Rtn. Archana Vibhute**
Literacy And Wins


**Rtn. Dr. Shamim Patel**
Women's in Rotary


**Rtn. Milind Bhide**
Club Bulletin Editor


**Rtn. Suraj Mali**
Fellowship

# परिचय



रोटे. डॉ. अतिक पटेल
President 2025-26

रोटरी क्लब ट्रेड सिटी जयसिंगपूर सन २०२५-२६ सालाकरीता अध्यक्ष पदावर निवड झालेले रोटे. डॉ. अतिक पटेल हे गेली २० वर्षे रोटरी कार्यात सक्रीय आहेत. रोटे.डॉ. अतिक पटेल हे रोटरी क्लब ट्रेड सिटी जयसिंगपूरचे जीएसआर आहेत. रोटे. डॉ. अतिक पटेल हे गेली ३६ वर्षे वैद्यकीय सेवेत असून सन १९९४ ते १९९८ व २०१८ ते २०२४ या सालाकरीता जयसिंगपूर मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष पद भूषविले आहे.

रोटरीच्या माध्यमातून सन २०१८-१९ नायजेरिया मेडिकल मिशनमध्ये सहभाग नोंदवला व वैद्यकीय सेवा बजावली. २०२४ साली रोटरी फ्रेंडशिप एक्सचेंज या अंतर्गत केनिया येथे भेट दिली. सन २०१३-१४ या साली असिस्टंट गव्हर्नर या पदावर कार्य करत बेस्ट असि. गव्हर्नर हा पुरस्कार संपादन केला. डिस्ट्रिक्ट ३१७० मध्ये विविध पदावर कार्य केले. रोटे. डॉ. अतिक पटेल हे मेजर डोनर आहेत. २०२३-२४ साली असि. डिस्ट्रिक्ट ट्रेनर म्हणून काम पाहिले.

रोटे. डॉ. अतिक पटेल हे मदिना मस्जिद ट्रस्ट, डॉ. झाकीर हुसेन एज्युकेशन सोसायटी, जी.डी. पटेल एज्युकेशन सोसायटी, शाणदार स्पोर्टस् ॲन्ड एज्युकेशन असोसिएशन, जयसिंगपूर नगरपालिका शिक्षण मंडळ, सिटीझन फोरम, लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटी या संस्थांच्या विविध पदावर कार्यरत आहेत. तसेच त्यांनी आजवर केलेल्या वैद्यकीय व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना धन्वंतरी रत्न, डॉ.जे.जे. मगदूम समाजभूषण, धन्वंतरीभूषण व इतर पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा कोव्हीड योध्दा हा पुरस्कार मिळाला आहे. सध्या ते रोटरी क्लब ट्रेड सिटीचे सेक्रेटरी म्हणून काम पाहणार आहेत. त्यांच्या कार्यात पत्नी डॉ. शमीम पटेल व डॉ. अनिक, इंजि. शारीक ही दोन मुले व डॉ. हुमेरा, डॉ. अंजुम या दोन मुलींची सदैव साथ लाभत आहे.



रोटे. महेंद्र पोरवाल
Secretary 2025-26

रोटरी क्लब ट्रेड सिटी जयसिंगपूर सन २०२५-२६ सालाकरीता सेक्रेटरी पदावर निवड झालेले रोटे. महेंद्र पोरवाल हे गेली ४ वर्षे रोटरी कार्यात सक्रीय असून ते या क्लबचे चार्टर्ड मेंबर आहेत. त्यांनी आपले इंजिनिअरींगचे शिक्षण (बी.ई.) वालचंद कॉलेज, सोलापूर येथून पूर्ण केले आहे.

रोटे. महेंद्र हे २५ वर्षे हिंदुस्थान गारमेंट या रेडिमेड रिटेल व्यवसायामध्ये कार्यरत असून पारकर या नामांकित मेन्स वेअर ब्रॅन्डचे निर्माते आहेत. रोटे. महेंद्र हे सामाजिक व धार्मिक कार्यात सहभागी असतात.

रोटे. महेंद्र यांच्या पत्नी सौ. रमिला या गृहिणी असून सुपुत्र पियुष यांचे एम.बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले आहे. मुलगी कु. दिशा हिने कंपनी सेक्रेटरी (सी.एस.) चे शिक्षण पूर्ण केले आहे. स्नुषा सौ. निशा यांचे चार्टर्ड अकौंटंट (सी.ए.) पर्यंत शिक्षण पूर्ण असून त्या त्यांच्या पतीच्या व्यवसायात हातभार लावत आहेत.

# परिचय



**रोटे. ॲड. उदय कुलकर्णी**
Treasurer 2025-26

रोटरी क्लब ट्रेड सिटी जयसिंगपूर सन २०२५-२६ सालाकरीता ट्रेझरर पदावर निवड झालेले रोटे. ॲड. उदय कुलकर्णी हे गेली ४ वर्षापासून रोटरीच्या कार्यात सक्रीय असून ते या क्लबचे चार्टर मेंबर आहेत. रोटे. ॲड. उदय कुलकर्णी हे गेली २५ वर्षांपासून कायद्याचे पदवीधर असून जयसिंगपूर न्यायालयात सरकारी वकील म्हणून गेली १० वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या कायद्याच्या प्रदीर्घ अभ्यासामुळे अट्टल गुन्हेगारांना त्यांनी शिक्षेपर्यंत पोहोचविले आहे. त्याचबोबर सामाजिक क्षेत्रामध्ये संघर्ष बहुउद्देशीय सेवा संस्था या संस्थेमार्फत जयसिंगपूर शहरामध्ये विविध समाजपयोगी व सांस्कृतिक क्षेत्रात ते अग्रेसर आहेत.

आपल्या व्यवसायिक कार्याबरोबरच रोटरी कार्यात अग्रेसर असलेले रोटे. ॲड. उदय कुलकर्णी यांचा विवाह सौ. ज्योत्स्ना यांचेशी झाला असून त्या ही ॲडव्होकेट म्हणून जयसिंगपूर न्यायालयात व विविध बँका व पतसंस्थांमध्ये कायदेशीर सल्लागार म्हणून आपले कर्तव्य बजावित आहेत. त्यांना गंधार हा चिरंजीव मॅकॅनिकल इंजिनिअर असून सध्या यु.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहे.

रोटे. ॲड. उदय कुलकर्णी हे ट्रेझरर म्हणून जबाबदारी उत्कृष्टरित्या बजावून क्लबचे नांव डिस्ट्रिक्टमध्ये एका नव्या उंचीवर पोहोचवतील ही अपेक्षा.



**रोटे. गिरीश कुलकर्णी**
Asst. Governer 2025-26

रोटे. गिरीश कुलकर्णी यांचे दत्तवाड येथे प्राथमिक व शालेय शिक्षण तर महाविद्यालयीन शिक्षण एस. पी. कॉलेज पुणे व वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग सांगली येथे झाले. स्काय इंजिनीअरिंग सर्व्हीसेस या नावाने इंजिनीअरिंग मशीन टूल्स व टेस्टिंग मशीन्स करिता लागणाऱ्या फॅब्रिकेशन जॉबचे उत्पादक, तसेच स्पेशल पर्पज मशीन व ऑटो लूम्स करिता लागणाऱ्या बीम्सचे उत्पादक आहेत. या परिसरातील अनेक प्रथितयश अस्थापनांना गुणवत्तापूर्ण उत्पादनांचा पुरवठा करतात.

रोटरी सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेशी संलग्न असणाऱ्या इचलकरंजी रोटरी परिवारातील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी एक्झिक्युटीव्ह चे चार्टर प्रेसिडेंट (संस्थापक अध्यक्ष) म्हणून कार्य. रोटरीच्या माध्यमातून अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणीक व वैद्यकीय उपक्रमात सक्रीय सहभाग. रोटरीच्या एकंदर कार्यकाळात 'बेस्ट सेक्रेटरी', 'बेस्ट अपकमींग क्लब' व 'बेस्ट प्रेसिडेंट' अशा डिस्ट्रीक्ट मधील विविध पुरस्कारांने सन्मानीत. डिस्ट्रीक्ट ३१७० मधील अनेक पदांवर कार्य केले असून यावर्षी रोटरी वर्ष २०२५-२६ करिता उपप्रांतपाल व डिस्ट्रीक्ट सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. पं. बाळकृष्ण बुवा संगीत साधना मंडळाच्या माध्यमातून इचलकरंजी व परिसरातील संगीत रसिकांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या अनेक सांगीतीक व सांस्कृतिक उपक्रमात सक्रीय सहभाग. पत्नी सौ. सविता गिरीश कुलकर्णी (M.A.B.Ed. English) (ज्युनिअर कॉलेज ला लेक्चरर म्हणून सेवा). विवाहीत कन्या सौ. राधा प्रथमेश नेरूरकर, पुणे येथे स्थायीक व सध्या विविध संस्था व व्यक्तींसाठी समुपदेशनाचे कार्य. दुसरी कन्या कु. सई गिरीश कुलकर्णी शिक्षणाच्या निमित्ताने सध्या पुणे येथे वास्तव्यास.

# Trade City at Glance 2024-25



चौथा पदग्रहण सोहळा २०२४-२५



बोर्ड ऑफ डायरेक्टर्स २०२४-२५



मिरर प्रकाशन सोहळा


रोटरी पब्लिक स्कूलचे उद्घाटन


डॉक्टर्स, सी.ए., फार्मर्स डे सेलिब्रेशन



मेंबरशिप डेव्हलपमेंट सिल्व्हर ॲवॉर्ड


नेशन बिल्डर ॲवॉर्ड


२२ सायकलचे विद्यार्थ्यांना वाटप


स्वातंत्र्य दिनानिमित्त बुध्दीबळ स्पर्धेचे आयोजन



हृदयविकार संदर्भात सेमिनारचे आयोजन


डिस्ट्रिक्ट गव्हर्नर्स ॲप्रीसिएशन ॲवॉर्ड


अभियोग्यता चाचणी शिबीर

# Trade City at Glance 2024-25


बर्थ डे सेलिब्रेशन


बर्थ डे सेलिब्रेशन


वृक्षारोपण


शालेय विद्यार्थ्यांना छत्री वाटप


अभियंता दिनानिमित्त पुरस्कार वितरण


फेलोशिप निवासी गेट टूगेदर


एम.एस.ई.बी. कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप


सॅनिटरी पॅड वेंडींग व इन्सीनेटर मशिन


सार्वजनिक कुपनलिकेचे उद्घाटन


सैनिक टाकळी विद्यार्थ्यांना सायकल वाटप


प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे महाकुंभ मेळाव्यात महाकुंभ स्नान


श्री. पांडव, चिपरी यांना वॉकर प्रदान

# Trade City at Glance 2024-25



विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वितरण



एक शाम डॉक्टर्स के नाम गाण्याचा कार्यक्रम



गरजूंना ब्लँकेट व खाद्यपदार्थ वाटप



चार्टर्स डे सेलिब्रेशन



इथे ओशाळला मृत्यू या नाटकाचे आयोजन

Rotary
Dist. 3170
Club No. 224200

## The 4 Way Test

*of the things we think, say or do*

1. Is it the TRUTH?
2. Is it FAIR to all concerned?
3. Will it build GOODWILL and BETTER FRIENDSHIPS?
4. Will it be BENEFICIAL to all concerned?

## CLUB FLAG

